प्रसिध्दी पत्रक दिनांक : २७/०९/२०२४

**लोकसेवक अमोल धर्मा खैरनार, मोटार वाहन निरीक्षक, प्रादेशिक परिवहन विभाग नांदेड यांनी खाजगी इसम इंगळे यांचे मार्फतीने देगलुर चेकपोस्ट येथे ट्रकचे एन्ट्री साठी ५००/– रुपयांची लाच स्विकारल्याने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या जाळ्यात**

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड युनिट |
| पोलीस ठाणे | पो.स्टे देगलुर जि.नांदेड |
| गुन्हा रजिस्टर नंबर | गुरनं ४५८/२०२४ कलम ७ अ, १२ भ्र.प्र.अ.१९८८ |
| गुन्हा दाखल दिनांक व वेळ | दिनांक २६.०९.२०२४ रोजी चे ०८.१६ वाजता |
| आरोपी लोकसेवक यांचे नाव, हुद्दा व पत्ता | १) श्री. अमोल धर्मा खैरनार , वय– ४२ वर्षे, पद– मोटर वाहन निरीक्षक , (वर्ग– ०२) नेमणूक– आरटीओ सीमा तपासणी नाका, तालुका– देगलूर जिल्हा –नांदेड रा. प्लॉट नंबर २० ब ओंकार नगर नाशिक जिल्हा नाशिक सध्याचा पत्ता फ्लॅट नंबर १४ बात्रा बिल्डिंग एस क्लब नगर रोड छत्रपती संभाजी नगर<br>२) खाजगी इसम गोपाळ म्हैसाजी इंगळे वय ४१ वर्ष व्यवसाय मदतगार आरटीओ पोस्ट देगलूर राहणार सक्करगा तालुका मदनूर जिल्हा कामारेड्डी |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | ५००/– रु |
| लाच स्विकारली रक्कम | ५००/– रु |
| थोडक्यात माहिती | तक्रारदार हे ट्रान्सपोर्ट ट्रक मालक असून त्यांचे अकोला ते हैदराबाद रोडवर ट्रक चालतात त्यामुळे नांदेड जिल्ह्यातील देगलूर येथील आरटीओ विभागाचे अधिकारी व त्यांनी ठेवलेले प्रायव्हेट एजंट हे त्यांचेकडील ट्रकच्या ड्रायव्हर कडून गाडीचे सर्व कागदपत्रे बरोबर असताना व गाडीचे वजन बरोबर असतानाही एन्ट्री च्या नावाखाली ५०० रु.लाचेची मागणी करीत असल्याबाबत दिनांक २४/०९/२०२४ रोजी तक्रार दिल्यावरून दि २५/९/२४ रोजी केलेल्या पडताळणी कार्यवाही दरम्यान देगलूर येथील आरटीओ चेक नाक्यावरील खाजगी एजंट श्री गोपाळ इंगळे यांनी पंचा समक्ष व आलोसे श्री अमोल खैरनार मोटार वाहन निरीक्षक देगलूर चेक पोस्ट यांच्या उपस्थितीत ५०० रुपये लाचेची मागणी करून स्वीकारण्याचे मान्य केले. तसेच सापळा कार्यवाही दरम्यान ५०० रु पंचासमक्ष व श्री अमोल खैरनार मोटर वाहन निरीक्षक देगलूर चेक पोस्ट यांच्या समक्ष लाच रक्कम स्वीकारले. सापळा कार्यवाही दरम्यान आलोसे यांच्या कार्यालयात रोख रक्कम ६३,८२० रुपये मिळून आले, सदर रकमेबाबत आलोसे यांच्याकडे विचारणा केली असता त्यांनी योग्य व समाधानकारक उत्तर दिले नाही, तसेच सदर रकमेबाबत कॅशबुक रजिस्टर ला कोणत्याही कायदेशीर नोंदी दिसून आल्या नाही. म्हणुन नमूद रक्कम पंचासमक्ष पुढील तपास कामी जप्त करण्यात आले आहेत. नमुद आलोसे यांना ताब्यात घेण्यात आले असून पोलीस स्टेशन देगलुर जि.नांदेड येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. |
| गुन्हयाचा तपास | श्री. जमीर नाईक, पोलीस निरीक्षक, लाप्रवि नांदेड, हे करीत आहे. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाशी संपर्क साधावा.

| | |
|---|---|
| संपर्क पत्ता :– लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड, नागार्जुनसागर बिल्डील स्नेहनगर/श्रीनगर नांदेड | |
| संपर्क कमांक :– 02462–253512<br>टोल फी कमांक– 1064 | ऑनलाईन तकार ॲप्लीकेशन acbmaharashtra.net |
| | पोलीस उपअधीक्षक 9870145915 |
| मा. पोलीस अधीक्षक 9545531234 | ई–मेल आयडी<br>dyspacbnanded@mahapolice.gov.in |
| ई–मेल आयडी<br>spacbnanded@mahapolice.gov.in | TWITTER - @ACBnanded |
| FACEBOOK – Dysp Acb Nanded | |
| INSTAGRAM – acb_nanded | |

कार्यालय, पोलीस उप अधीक्षक ला.प्र.वि. नांदेड,युनिट

पोलीस उपअधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड

Scanned with CamScanner